नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २१**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ फिर्यादी यांची जबानी शपथेवर सुरू

माझे नाव :- भारती तुळशीराम कुऱ्हाडे,
माझे वय :- ६५ वर्षे,
व्यवसाय :- शेती,
राहणार :- मानवत, ता. मानवत, जि. परभणी.

---

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ फिर्यादी यांचा सरतपास श्री. डी. एस. नाटकर सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–

माझ्या परिवारात मी, माझे दोन मुले व दोन सुना आहेत. माझे पती १० वर्षापुर्वी मयत झाले. माझे शेत गट क्र.६९ स्मशानभुमी, बौध्दवाडा जवळ मानवत येथे आहे. घटना ०२ वर्षापुर्वी आरोपी अरूणा कुऱ्हाडे यांच्या घरासमोर दुपारी ३.०० च्या सुमारास घडली होती. त्यावेळी मी व माझी सुन उर्मिला आरोपी क्र.१ च्या घरी ''आरोपीचा मुलगा गोविंद याने आमच्या शेतातील कापूस वेचणाऱ्या बायांना का हाकलुन दिले'' असे विचारण्याकरीता गेले होते. त्यावेळी आरोपी क्र.१ ने तु आम्हाला विचारणारी कोण, शेत आमचे आहे, असे म्हणून मला ''छिन्नाले, रांड, मोकारे, तुम्ही झवुन घेतात'' अशी अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर तिथे आरोपी क्र.२ आला व तो ''छिन्नाले, रांड, तु कशी शेतात गेली, तुझा खुन करतो'' असे म्हणाला. तसेच त्याने माझी सुन उर्मिला हिला दोन चापटा मारल्या. त्यानंतर माझा मुलगा दिलीप याने आमच्या भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशनला जावुन तक्रार दिली. आता मला फिर्याद व प्रथम खबर दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. त्या दोन्हीवर माझी सही आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.२२ व २३** देण्यात येते. ज्या आरोपींनी आम्हांला शिवीगाळ केली, त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकते. आज रोजी ते न्यायालयासमक्ष हजर आहेत.

## उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. ए. जे. काळदाते यांच्यामार्फत सुरू :–

२) माझे पती नगरपालिकेत नोकरीस होते. माझे सासरे अंदाजे २० वर्षापुर्वी मयत झाले असावेत. हे म्हणणे खरे आहे की, माइया सासऱ्यास दोन पती होत्या व दोघींना मुलबाळ होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती तुळशीराम, आरोपी क्र.१ चे

नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २१**

पती निवृत्ती व आरोपी क्र.२ वडील उत्तम हे सख्खे भाऊ असून तुळशीराम हे सर्वात मोठे होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या लग्नानंतर निवृत्ती व उत्तम कुऱ्हाडे यांचे लग्न झाल्यावर आम्ळी सर्व विभक्त राहतो. उत्तम हे पेठ मोहल्ला, मानवत येथे राहतात तर निवृत्ती हे जुन्या वाड्यात राहतात. मी देखील जुन्या वाड्यात राहते. माझ्या व आरोपींमध्ये साधारण १० वर्षापासून शेतीचे वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर ६९ मध्ये आमची ०४ एकर शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर ६९/१ मध्ये निवृत्ती यांची ०२ एकर व उत्तम यांची ०.७९ आर एतकी जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीनीचे निवृत्ती व उत्तम मालक व ताबेदार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ६३/३, ६३/५, ६३/७ व ६३/८ मधील एकूण ०२ एकर ११ आर जमीन माझे पती तुळशीराम यांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीच्या नंतर सदर जमीन माझ्या नावे नोंदवण्यात आलेली आहे.

३) हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हयात असताना तुळशीराम, उत्तम व निवृत्ती यांच्यात जमीनीचे वाद नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६९ ही गावाला लागुन असून त्याच्याजवळ जिनींग आहे. हे म्हणणे खरे आहे की, उत्तम व निवृत्ती यांनी मनाई हुकूमाकरीता आमच्याविरूध्द दिवाणी दावा प्रस्तुत न्यायालयात दाखल केला होता व त्यामध्ये परभणी येथे न्यायालयात अपील दाखल केले असता, तिथे आमच्याविरूध्द हुकूमनामा पारित केलेला आहे.

४) घटनास्थळाच्या पूर्वेस माझे घर असून घटनास्थळाच्या व माझ्या घरामध्ये रस्ता आहे. सदर रस्ता वर्दळीचा आहे. घटनास्थळाच्या पश्चिमेला कलाल व उत्तरेस नारायण माळी यांचे घर आहे. घटना २ ते ३ तास चालु होती. हे मला माहिती नाही की, घटनेवेळी किती लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ च्या घरापासून घटनास्थळ दिसत नाही. आरोपी क्र.२ घटनास्थळी घटना चालु असताना साधारण ०१ तासाच्या आता आले होते. माझा मुलगा दिलीप हा घटना घडल्यानंतर घटनास्थळी आला होता. घटनेच्या वेळी माझा मुलगा संजय घरी होता.

५) हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडलीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.६९ मधील जमीन उत्तम व निवृत्ती कुऱ्हाडे यांच्या नावावर असून सध्या सदर जमीन

नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २१**

प्लॉटिंगची असून त्यांनी सदर जमीन आम्हांला देण्यास नकार दिला, म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी आम्ही आरोपींविरूध्द प्रस्तुतची खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

ठिकाण : मानवत
दिनांक: २०/०३/२०२६

Digitally signed by PRANJASVI PHATALE
Date: 2026.03.20 17:10:05 +0530

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.